# स्वातंत्र्योत्तर भारतातील महिला सबलीकरण

**श्री पी. जे. चौधरी,** इतिहास विभाग, राजे रामराव महाविद्यालय, जत.

---

**प्रास्ताविक:**

भारतातील लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महिलांची प्रगती होणे आवश्यक आहे. लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी व लोकशाहीच्या प्रगतीसाठी देशातील प्रत्येक नागरिकांच्या सहकार्याची गरज आहे. त्यामध्ये स्त्री-पुरुष या दोन्ही घटकांची सामन्तर आवश्यकता आहे.भारतातप्राचीन काळापासून महिलांना मानवी विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आलेले होते. महिलांना वैयक्तिक व सामुहिक विकासाच्या प्रवाहात सहभागी होता येणार नाही अशीच व्यवस्था पुरुषप्रधान संस्कृतिने भारतात तयार केली होती. त्यासाठी महिलांवर अतिशय वाईट प्रकारची बंधने घातलेली होती. अनेक वाईट रूढी, प्रथा, परंपरा महिलांवर लादविण्यात आल्या. सती प्रथा, देवदासी प्रथा, केशवेपन पद्धत, पुनर्विवाहाचा अधिकार नाही, बालविवाह, जरठ सुंदरी विवाह इत्यादी. कुटुंबापुरती सिमित राहील, समाजामध्ये सहभागी होता येणार नाही, शिक्षणाचा अधिकार नाही अशीच व्यवस्था स्त्रियांसाठी निर्माण करण्यात आलेली होती. स्वातंत्र्यापूर्वी महिलांना उपेक्षित ठेवल्यामुळे मानवी समाजाच्या विकासात महिलांचा हातभार लागत नव्हता. विकासाच्या प्रवाहापासून महिला वंचित होत्या. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाच्या माध्यमाने महिलांना त्यांचे हक्क व अधिकार देण्यात आले. महिला विविध क्षेत्रात कार्य व नेतृत्व करू लागल्या महिला मानवी विकासाच्या प्रवाहात आल्यामुळे लोकशाहीच्या बळकटीकरणाला मदत झाली.स्वातंत्र्योत्तर भारतात महिलांचे सबलीकरण संविधानातील तरतुदी, संविधानातील तरतुदीच्या आधारे पारित करण्यात आलेले विविध कायदे, महिलांच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजना इत्यादीमुळे महिलांचा झालेला विकास आणि लोकशाहीच्या बळकटीकरणात महिलांचे योगदानाचा आढावा या ठिकाणी घेणे आवश्यक आहे.

**ब्रिटिश काळातील महिला सबलीकरणासाठीचे प्रयत्न:**

ब्रिटीश काळात समाजसुधारकांनी महिलांवर लादविण्यात आलेल्या वाईट प्रथा-परंपरा समाज जागृतीच्या माध्यमातून समाप्त करण्याचा प्रयत्न केला सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता समाज सुधारकांनी महिलांना शिक्षण देण्याचे कार्य केले. ब्रिटीशांनी महिलांवरील वाईट प्रथा-परंपरांवर बंदी घालणारे कायदे केले.त्यामध्ये इ.स.१८२९ चा सतीबंदी कायदा, इ.स.१८५६ चा विधवा पुनर्विवाह कायदा इ.स.१८५४ इत्यादी अनेक कायदे केले. शिक्षणावर आधारीत चार्ल्स वुडच्या खलीत्यात स्त्री शिक्षणाला विशेष उत्तेजन द्यावे अशी शिफारस करून स्त्री शिक्षणाला उत्तेजन दिले. म्हणजे महिलांचा वयक्तिक विकास, कुटुंब व समाजाच्या विकासासाठी स्त्री शिक्षणाचे समर्थन केले.

**स्वातंत्र्योत्तर काळातील महिला सबलीकरणासाठीचे प्रयत्न:** स्वातंत्र्योत्तर काळात संविधानाचा आधार घेवून महिलांच्या सबलीकरणासाठी सामाजिक संघटनांनी कार्य केले. महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क व अधिकार मिळावेत, महिलांवर होणारे अन्याय-अत्याचार बंद व्हावेत यासाठी धरणे, मोर्चे, आंदोलने करून कायदे बनविण्यासाठी सामाजिक संघटनांनी सरकारवर दबाव आणण्याचे कार्य केले. त्यामुळे महिलांच्या सबलीकरणासाठी अनेक कायदे भारत सरकारने पारित केले. या कायद्यांमुळे महिलांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळाले.

**संविधान व महिला सबलीकरण:**

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीवर पुरुष प्रधान प्रवृतीचे वर्चस्व असल्यामुळे महिलांना सामाजिक व्यवस्थेपासून व विकासाच्या प्रवाहापासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यामुळे स्वतंत्र भारतात महिलांचे हक्क, अधिकार व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय संविधानात राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची तरतूद केकेली दिसून येतेमहिलांचे मुलभूत हक्क अबाधित राहावेत यासाठी भारतीय संविधानात अनुच्छेद १४, १५ (३),१६, ३९ (ए), ३९ (बी), ३९ (सी), ४२ इत्यादी विशेष तरतुदींचा समावेश करण्यात आला.

**महिलांविषयक कायदे व सबलीकरण:**

भारतीय संविधानातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक कायदे पारित करण्यात आले. फॅमिली कोर्ट **ॲ**क्ट१९५४,स्पेशल मॅरेज **ॲ**क्ट १९७५, हिंदू मॅरेज **ॲ**क्ट १९५५, मॅटर्निटी बेनिफिट **ॲ**क्ट १९६१ (विधीसुधाराना) १९५५, भारतात राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ मध्ये करण्यात आली. दहेज निषेध अधिनियम, १९६१ पारित करून हुंडा प्रथेवर बंदी घालण्यात आली व हुंडा घेणाऱ्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली महिला अभद्र प्रदर्शन निषेध अधिनियम, १९८६ स्त्री अब्रूला सुरक्षा प्रदान करण्यात आली. घरघुती हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ नुसार महिलांना घरघुती हिंसेपासून संरक्षण देण्यात आले.व महिलेवर सासर किंवा माहेरच्या व्यक्तींकडून अन्याय झाल्यास सबंधित व्यक्तीवर गुण्याची तरतूद करण्यात आली. गर्भादान पूर्व व प्रसूती पूर्व निदान तंत्र अधिनियम, १९९४ नुसार मुलीला जन्म घेण्याच्या अधिकाराचा हक्क प्रदान करण्यात आला.व या अधिनियमानुसार गर्भाच्या लिंग तपासणीवर बंदी घालण्यात आली व तसे केल्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली. मातृत्व लाभ अधिनियम, १९६१ नुसार महिलांना माता होण्याचा व रोजगार मिळविण्याचा हक्क देण्यात आला. शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार महिलांसाठी शिक्षण सोपे करण्यात आले. बाल विवाह निषेध अधिनियम, २००६ पारित करून १८ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलींचे विवाह करण्यास बंदी घालण्यात आली. समान पारिश्रमिक अधिनियम, १९९६ नुसार स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता समान कामासाठी समान वेतनाची तरतूद करण्यात आली. आपराधिक कानून (संशोधन) अधिनियम, २०१३ महिलांवरील बलात्कार प्रकरणात गुन्हेगाराला कठोर शिक्षा देण्यासाठी पारित करण्यात आला. महिलांच्या स्वास्थ्य संबंधीत सुरक्षेसाठी जननी सुरक्षा योजना, राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ्य मिशन, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, पुनर्गठित

संमेकित बाल विकास सेवाइत्यादी योजना राबविण्यात आल्या. महिलांच्या आर्थिक-सामाजिक प्रगती करण्यासाठी राष्ट्रीय महिला कोष निर्माण करण्यात आला. महिलांना प्रशिक्षण व रोजगार मिळण्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका इत्यादी मध्ये ३३ टक्के आरक्षण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम पारित करून महिलांना कमीत-कमी १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देणे निश्चित करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या सबलीकरणासाठी विविध अन्याय प्रतिबंधक, सुरक्षात्मक कायदे, स्वास्थ्य व रोजगार विषयक योजना भारत सरकारने राबविल्यामुळे सामाजिक व आर्थिक विकासात महिलांचा हातभार लागला. त्यामुळे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मदत झाली.

**स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांचा विकास:**

स्वातंत्र्योत्तर भारतात महिलांचे सबलीकरणासाठी संविधानातील तरतुदी, संविधानातील तरतुदीच्या आधारे पारित करण्यात आलेले विविध कायदे, महिलांच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनामुळे महिला मानवी विकासाच्या मुख्य प्रवाहात आल्या. महिलांचा वयक्तिक विकास झाला. त्यातून त्यांनी कौटुंबिक व सामाजिक वाकासामध्ये मदत केली.भारत स्वतंत्र झाल्यापासून आज पर्यंतचा आढावा घेतला तर अनेक स्त्रियांनी राष्ट्रपती, पंतप्रधान या सर्वोच्च पदांपासून तर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदापर्यंत नेतृत्व केलेले दिसून येते अनेक स्त्रिया सामाजिक कार्यात नेतृत करीत आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रात ज्ञान दानाचे काम करत आहेत. विविध क्षेत्रातील प्रशासकीय पदावर कार्य करतांना दिसून येतात.

**लोकशाहीच्या बळकटीकरणात महिलांचे योगदान:**

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मानवी समूहाच्या सर्वच घटकांच्या सहकार्याची गरज आहे. त्यामुळे सर्व घटकांना समान न्याय मिळाला तर लोकशाही टिकून राहील. स्वातंत्र्योत्तर भारतातात संविधान आणि संविधानातील तरतुदींच्या आधारे महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध कायदे पारित करण्यात आल्यामुळे महिलांना त्यांचे निसर्गदत्त हक्क आणि अधिकार मिळाले. विकासाच्या प्रवाहात महिलांचा सहभाग वाढला.आज भारतामध्ये जाती, जमाती, भाषा, प्रदेश इत्यादी भिन्नता असतांनाही स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षानंतरही अखंड भारत व लोकशाही टिकून आहे. निवडणुकीत महिला मतदानाचा हक्क बजावत आहेत. कोणत्याही आमिसाला बळी न पडता योग्य व्यक्तीला मतदान करतांना दिसून येतात. निवडणुकीतील अनेक पदांच्या जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पडतात.

**मूल्यमापन:**

ब्रिटिश काळात समाजसुधारकांनी महिलांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न केले. महिलांच्या हक्क आणि अधिकारासाठी समाजजागृती करण्याचे कार्य केले. ब्रिटिश सरकारच्या माध्यमाने विविध कायदे पारित करवून घेवून महिलांवरील अन्यायकारक बंधने हटविण्याचा प्रयत्न केला. महिलांना शिक्षण देण्याचेही कार्य केले. स्वातंत्र्यानंतर संविधान,

कायदे व विविध योजनांच्या माध्यमाने महिला सबलीकरणाचे कार्य करण्यात आले. महिलांच्या विविध समस्यांचे निराकणार करण्यात येत आहेत. त्यामुळे सामाजिक व्यवस्थेत महिलांचा सहभाग दिवसेंदिवस वाढतांना दिसून येतो. वर्तमान काळात लोकशाही बळकट करण्यात महिला आपले योगदान देतांना दिसून येतात.

**संदर्भ:**

१.डॉ.वैद्य सुमन व डॉ.कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.२५९

२.ग्रोवर बी.एल., आधुनिक भारत का इतिहास, एस.चंद एन्ड कंपनी प्रा.लि. नई दिल्ली, पृ.क्र.२५७

३.कित्ता,पृ.क्र.६०३

४.https://www.mahamtb.com/Encyc/2019/11/26/Article-on-Constitution-day-by-Indira-Labdhe.amp.html